महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ /फॅक्स-२६४७ ३८ १८ Email : chairman-msbve@nic.in

**जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/एप्रिल२०१५/२०१४/९८४५** **दिनांक :- २० /०९ /२०१४**

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण अधिकारी, (सर्व)

विषय :- **दि. १०/०९/२०१४ रोजी व त्यानंतर मान्यता/नुतनीकरणे दिलेल्या संस्थांना विद्यार्थी प्रवेशासाठी मुदतवाढ देणेबाबत (१ व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रम)**

संदर्भ - १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा.नि. क्र. व्हिओसी-२०१४/प्र.क्र.१२६/व्यशि-४, दि. ५/८/२०१४
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा.नि. क्र. व्हिओसी-२०१४/प्र.क्र.१२६/व्यशि-४, दि. २२/८/२०१४
३) या कार्यालयाचे पत्र क्र. मराव्यशिपमं/का-४/परीक्षा/जाने-एप्रिल २०१५/२०१४/१६२१, दि. ३०/०८/२०१४

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, ज्या संस्थांना वरील संदर्भ क्र. ०१ व ०२ च्या शासन निर्णयानुसार नुतनीकरण प्राप्त झालेले आहे तसेच ज्या संस्थांची मान्यता/नुतनीकरणाची प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झालेली अशा कार्यरत संस्थांना त्यांच्या संस्थेत असलेल्या सहामाही/वार्षिक अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा याकरीता अतिविलंब शुल्कासह दि. १५/०९/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असलेबाबत वरील संदर्भ क्र. ०३ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आलेले होते.

परंतु काही संस्थांना दि. १०/०९/२०१४ नंतरही मान्यता/नुतनीकरण प्रदान करण्यात आलेले आहे. अशा संस्थांना विद्यार्थी प्रवेश करणे, संगणकीय सॉफ्टवेअरमध्ये भरणे व चलन भरून विद्यार्थ्यांची माहितीची सीडी भरून संबधित जिल्हा कार्यालयाकडे सादर करण्यास अत्यल्प कालावधी मिळत असल्याने,

**ज्या संस्थांना दि. १०/०९/२०१४ रोजी व त्यानंतर मान्यता/नुतनीकरण प्रदान करण्यात आलेले आहे केवळ अशाच संस्थांना दि. ३०/०९/२०१४ पर्यंत विद्यार्थी प्रवेश करण्यास अतिविलंब शुल्कासह मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच सदर मुदतवाढ केवळ १ व २ वर्ष कालावधी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच लागू आहे, याची नोंद घ्यावी. सहामाही अभ्यासक्रमांसाठी ही मुदतवाढ लागू नाही.**

अशा संस्थांबाबत अतिविलंब शुल्क घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबतचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सुधारीत प्रवेश कार्यक्रम (अतिविलंब शुल्कासह) | यापूर्वीची दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | १) ०१ वर्ष कालावधी अभ्यासक्रमास प्रविष्ठ विद्यार्थ्यांकडून नोंदणी व परीक्षा (अतिविलंब) शुल्क घेऊन प्रवेश देणे.<br>नोंदणी शुल्क रू. १०० + परीक्षा शुल्क रू. २०० +<br>Late Fee @ rate of १०० % of Examination Fees<br>(रू. १०० + रू. २००+ रू. २००/- = ५००/-)<br>प्रति विद्यार्थी रू. ५००/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क आकारून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.<br>२) ०२ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची केवळ नोंदणी फी रू. १०० घेण्यात यावी. या कार्यक्रमानुसार परीक्षा फी घेण्यात येऊ नये.<br>परीक्षा फी घेण्याबाबतचा कार्यक्रम संबधित परीक्षेपूर्वी कळविण्यात येईल. | दि. १५/०९/२०१४ पर्यंत | **दि. ३०/०९/२०१४ पर्यंत** |
| २ | **अ)** संस्थांनी अभ्याक्रमास प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून **अतिविलंब** शुल्क मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील शाखेत चालू खाते क्र. ३१४८५९९९५० मध्ये चलनाव्दारे भरण्यात यावे.<br>**ब)** संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट कम परीक्षा अर्जातील माहिती, मंडळाने दिलेल्या सॉफटवेअर मध्ये भरुन सी. डी. (VOCBOARD व MSBVE असे दोन फोल्डर असलेले ) तयार करणे. | दि. १६/०९/२०१४<br>व<br>दि. १७/०९/२०१४ | **दि. ०१/१०/२०१४<br>व<br>दि. ०४/१०/२०१४** |
| ३ | संस्थेने, प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉल्मेंट/परीक्षा सी.डी. व हार्ड कॉपी तसेच परीक्षा व नोंदणी शुल्क बँकेत भरलेल्या चलनाच्या मूळ प्रतीं व विद्यार्थ्यांच्या अभिलेखासह जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयात मंजूरीसाठी जमा करणे. | दि. १८/०९/२०१४<br>व<br>दि. १९/०९/२०१४ | **दि. ०७/१०/२०१४<br>व<br>दि. ०८/१०/२०१४** |
| ४ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची व अभिलेखांची तपासणी करणे.<br>**) संबधित संस्थेला अभ्यासक्रमाची राबविण्याची मान्यता आहे किंवा नाही आणि सुधारीत नुतनीकरण केलेले आहे किंवा नाही याच तपासणी करणे बंधनकारक आहे. मान्यता/नुतनीकरण केल्याची प्रत तपासल्याशिवाय याद्या मंजूर करु नयेत.*<br>***मंजूरी याद्यांवर जिव्यशिप्रअ यांची दिनांकीत स्वाक्षरी आवश्यक आहे.***<br>अ) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या अभिलेखची पडताळणी करून विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत किंवा नाहीत याची तपासणी करणे.<br>ब) संस्थेने सादर केलेल्या सीडीमध्ये जिल्हा कार्यालयाचा युजरनेम व पासवर्ड वापरून **किंवा** सर्व संस्थांच्या सीडी एकत्रित करून त्यामधे असणारी विद्यार्थ्यांच्या माहिती व संस्थेने जमा केलल्या विद्यार्थ्यांच्या यादीची तपासणी करणे.<br>क) शासकीय तांत्रिक विद्यालयातील कर्मचाऱ्यांची शिबिराप्रसंगी तपासणी करण्यासाठी मदत घ्यावी व तसे आदेश जिल्हा कार्यालय स्तरावरून देण्यात यावेत.<br>ड) जिल्हा कार्यालयाने पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या मंजूरीची एक प्रत | दि. २२/०९/२०१४<br>ते<br>दि. २५/०९/२०१४ | **दि. ०९/१०/२०१४<br>व<br>दि. १०/१०/२०१४** |

| | | | |
|---|---|---|---|
| | संबधित संस्थेस देण्यात यावी व दुसरी प्रत मंडळास पाठविण्यात यावी.<br>इ) तसेच संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची एक प्रत संस्थाप्रमुखाच्या सही शिक्यासह मंडळ कार्यालयास सादर करण्यात यावी. | | |
| ५ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या याद्यांनुसार सर्व संस्थांची खालील माहिती मंडळास सादर करणे.<br>i. विद्यार्थ्यांच्या एनरॉलमेंट व परीक्षा सी. डी. त्यातील माहितीची हार्ड प्रत.<br>ii. संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची साक्षांकीत प्रवेश यादी.<br>iii. जिल्हा कार्यालयाने प्रमाणित केलेली विद्यार्थ्यांची मंजूरी यादी.<br>iv. नोंदणी व परीक्षेचे नियमित शुल्क स्टेट बँकेत भरलेल्या चलनाची मूळ प्रत व तपासणीबाबतचे प्रमाणपत्र.<br>v. एप्रिल - २०१५ परीक्षेचे प्रश्नपत्रिका मागणीपत्रक (स्वतंत्र पत्राव्दारे)<br>vi. परीक्षा केंद्र यादी,<br>vii. स्टेशनरी व प्रवेशाबाबतचा गोषवारा यादी<br>viii. माजी विद्यार्थ्यांच्या बाबतीत मागील परीक्षेस विद्यार्थ्यांने प्राप्त केलेल्या गुणपत्रिकेची प्रत.<br>ix. सदर प्रवेश कार्यक्रम संस्थांना कळविल्याचे पत्र | दि. ३०/०९/२०१४ पर्यंत | **दि. १८/१०/२०१४ पर्यंत** |

मंडळाने यापूर्वी पाठविलेल्या प्रवेश कार्यक्रमांमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या माहितीची सीडी व वरील तक्त्यामधील अक्र ०५ मधे नमूद केलेले अभिलेख/कागदपत्रे तपासणीबाबतचा कार्यक्रम आपणांस स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सदर सुधारीत प्रवेश कार्यक्रम सर्व कार्यरत संस्थांना लेखी कळविण्यात यावा. तसेच याबाबत कोणतीही अडचण असल्यास तात्काळ मंडळ कार्यालयास संपर्क करण्यात यावा.

आपला,

(डी. ए. दळवी)
सचिव,
म.रा. व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रत :- १) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीसाठी सादर.

२) निरीक्षक/उपसचिव/सहा. सचिव/अधिक्षक यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

३) परीक्षा/मान्यता/संगणक विभाग

४) निवड नस्ती.